**<u>वदीतर्फे साक्षीदार क्र. ३ चा उलटतपास प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री. ए. टी. कासार यांच्यातर्फे शपथेवर सुरू :-</u>**

**२.** वादी ज्ञानेश्वर व संगिता हे माझे भाउबंद आहेत. माझे शिक्षण ईयत्ता चौथी पर्यंत झाले आहे. मला मराठी लिहीता व वाचता येते. दावा मिळकतीचा गट क्रमांक ८८ असुन त्याचे क्षेत्र मला सांगता येणार नाही. वादीची दावा मिळकतीलगत मोकळी जागा आहे, परंतु त्याचा क्रमांक मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादीची सदर मोकळी जागा दावा मिळकतीच्या उत्तरेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर मोकळया जागेत जयराम किसन गडाख यांनी घर बांधले आहे. हे म्हणणे खरे आहे की, जयराम गडाख यांनी त्यांचे घर महाराष्ट्र शासनाच्या घरकुल योजनेतुन बांधले आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीने दावा मिळकत खरेदी करण्यापुर्वीपासुन जयराम गडाख हे वर नमुद मोकळया जागेत राहतात.

**३.** मी मळयात राहतो. गावापासुन मळा दिड किलोमीटर अंतरावर आहे. मला दावा मिळकतीच्या चतु:सिमा सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या पुर्वेला प्रतिवादी क्र. १ चे घर होते व तेथे तो पहिल्यापासुन राहत होता. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ च्या शेळया व इतर जनावरे देखील तेथे होते. प्रतिवादी क्र. १ याने त्याच्या घरासाठी ग्रामपंचायतचे पाण्याचे नळ कनेक्शन घेतले होते किंवा कसे, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. २ च्या पत्नीने तेथे ब्युटी पार्लर व शिवनकामाचे दुकान सुरू केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींनी तेथे एक लोखंडाची टपरी देखील टाकली आहे. प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये कधीपासुन राहतात, हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या मोजणीला मी हजर नव्हतो. दावा मिळकतीच्या मोजणीच्या वेळी हद्दी खुणा कोणी दाखविल्या, हे मला सांगता येणार नाही.

**४.** हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत नामदेव कारभारी यांची होती, माझी नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही माझ्या नावावर नव्हती. दावा मिळकतीला पुर्वी पडलेला ग्रामपंचायत मिळकत क्रमांक, मला

सांगता येणार नाही, तो मी पाहिला नव्हता. माझे व नामदेव कारभारी आमच्यामध्ये दावा मिळकतीचे पुर्वी वाटप झाल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, दावा मिळकतीची पुर्वेची बाजु मला वाटपाने आली होती. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीचे दोन वेळा खरेदी व्यवहार वादीसोबत झालेले आहेत. माझ्या म्हणण्यानुसार त्यापैकी नंतरचे एक खरेदीखत मी वादीसोबत केले. सदरचा व्यवहार किती रक्कमेचा होता, हे मला आता आठवत नाही. त्यावेळी सदर मिळकतीला ग्रामपंचायत मिळकत क्रमांक किती होता, हे मला सांगता येणार नाही.

**५.** मी आज न्यायालयात साक्ष देण्यासाठी वादीचे पती ज्ञानेश्वर यांच्यासोबत आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रामधील मजकुर ज्ञानेश्वरने सांगितला आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत कोणती, मोजणी क्रमांक, ही सर्व माहिती मला ज्ञानेश्वरने दिली. पारेगांव बु. या गावचा सिटी सर्वे कधी झाला, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी माझे जवळचे भाउबंद असल्याने मी आज न्यायालयात साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

दिनांक : २४/०३/२०२६.

( के. के. पाटील)
२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
संगमनेर.